मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे
कलम ३५ नुसार अविश्वास प्रस्ताव
अपीलासंदर्भातील कार्यवाही.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक :- व्हीपीएम-२००८/प्र.क्र.२१७/पंरा-३,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. दिनांक :- १८ सप्टेंबर, २००८.

परिपत्रक :-

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ३५ मध्ये सरपंच किंवा उपसरपंच यांच्या विरुध्द अविश्वासाचा प्रस्ताव मांडण्यासंबधी तरतूद आहे. प्रस्तुत अविश्वास ठरावाच्या विधीग्राह्यतेसंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत. जिल्हाधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस असा निर्णय मिळाल्याच्या तारखेपासून ७ दिवसाच्या आंत विभागीय आयुक्तांकडे अपील करता येते व कलम ३५ (३-क) नुसार विभागीय आयुक्तांचा त्यावरील निर्णय अंतिम असतो. विभागीय आयुक्त यांनी प्रस्तुत प्रकरणी घेतलेला निर्णय अंतिम असल्याने विभागीय आयुक्त यांच्या निर्णयाविरुध्द अपील कर्त्यास दाद मागावयाची झाल्यास त्याला थेट उच्च न्यायालयात दाद मागावी लागते. या प्रकरणी शासनाकडे अधिनियमाच्या कोणत्याही कलमान्वये दाद मागता येत नाही किंवा अपील करता येत नाही.

२. तथापि, अपील संदभात अनेकवेळा वरील तरतुदीची माहिती नसल्याने, विभागीय आयुक्त यांनी कलम ३५ ( ३ क ) नुसार अंतिम निर्णय दिल्यानंतरही त्यांच्या निर्णयाविरुध्द शासनाकडे अपील दाखल करण्यांत येते तथापि, शासनास अपील दाखल करुन घेण्याचे व निर्णय देण्याचे अधिकार नसल्याने यामध्ये अर्जदाराचा नाहक वेळ व श्रम वाया जातो. तसेच शासनाचाही अनावश्यक पत्रव्यवहार वाढतो.

३. यास्तव, सर्व विभागीय आयुक्त यांना या परिपत्रकाद्वारे निदेश देण्यात येत आहेत की, विभागीय आयुक्त यांनी **मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ३५ ( ३-क ) नुसार निर्णय देतांना वरील तरतूदीची माहिती अर्जदारास अवगत करावी. जेणेकरुन सदर** निर्णयाविरुध्द अर्जदार शासनाकडे अपील करणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने

दि.

( मा.वा.गोडबोले )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
१) सर्व विभागीय आयुक्त,
२) सर्व जिल्हाधिकारी,

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी